(CNR NO.MHNS130003932022)

नियमित दिवाणी दावा क्र. ७७/२०२२

मेहमुद शेख ..वि.. शेख इम्तीयास व इतर

## निशाणी क्र.५५ खालील आदेश

प्रस्तूत अर्ज हा प्रतिवादी क्र. ३ यांनी त्यांची कैफीयत दाखल करणेसाठी झालेला विलंब माफ होवुन मिळणेसाठी केलेला आहे. वादी पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी क्र. ३ यांच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र. ३ हे पुणे येथे रहात असल्याने त्यांना न्यायालयात हजर राहुन मुदतीत कैफीयत दाखल करणे शक्य झाले नाही. त्यांना कैफीयत दाखल करणेकामी आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध न झाल्यामुळे कैफीयत दाखल करता आली नाही. प्रतिवादी ३ यांना जबाब व कैफियत दाखल करण्यास ७०० दिवसांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा हेतुपुरस्पर केलेला नाही. प्रतिवादी यांचा प्रस्तूतचा अर्ज मंजूर व्हावा अशी विनंती केली आहे.

३. वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केला. अर्जात नमुद केलेले कारण योग्य व संयुक्तीक नसल्याने अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली.

४. प्रतिवादीस जबाब/कैफीयत दाखल करण्यास ७०० दिवसांचा विलंब झालेला आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार प्रत्येक दाव्यात गुणदोषावर

चौकशी होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असते. अशा चौकशीसाठी पक्षकारांचे म्हणणे दाखल होणे व त्यांची योग्य बाजू मांडणे हे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे प्रतिवादी क्र.३ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणे न्यायोचित आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश:

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ३ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

KOLEKAR PRASAD DIPAK

Digitally signed by KOLEKAR PRASAD DIPAK
Date: 2025.02.10 17:24:51 +0530

(पी.डी. कोळेकर)

दिनांकः– १० /०२/२०२५

दिवाणी न्यायाधिश क. स्तर.,
पिंपळगांव बसवंत